**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ८८/२०२४**
**निशाणी क्र. १८**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
किशोर लक्ष्मण इंगळे + ३ **आरोपी.**

| | |
|---|---|
| शासन तर्फे साक्षीदार क्र. २ | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | किशोर मनोहर झेंडेकर |
| वय अंदाजे ३५ वर्षे | धंदा– नौकरी, पोलीस नाईक, ब.क.नं.९९७ स्थानीक गुन्हे शाखा, यवतमाळ. |
| राहणार | लोहारा, ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी स्थानीक गुन्हे शाखा, यवतमाळ येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो.

२. दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मौजा किन्ही येथे "शासन आपल्या दारी" या सभेकरीता माननीय मुख्यमंत्री हे येणार असल्यामुळे तसेच मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्यामुळे माझी नेमणूक पोलीस अधिक्षक यांच्या आदेशाने साध्या गणवेषामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री वनारे यांच्यासोबत गर्दी देखरेख करण्याकामी करण्यात आली होती.

३. त्यादिवशी सदर सभेला १५.४५ वाजता माननीय मुख्यमंत्र्यांचे सभास्थळी आगमन झाले. सभा सुरु असतांना १६.१५ वाजताच्या सुमारास स्टेज समोरील सभा मंडपाच्या मागील बाजूस चार इसम हे उभे राहून नारेबाजी करुन गोंधळ घालत होते. आम्ही साध्या गणवेषातील पोलीस तसेच गणवेषातील पोलीस हवालदार संदिप मेहत्रे यांनी त्या चारही इसमांना ताब्यात घेवून त्यांना सभा मंडपाच्या बाहेर काढीत असतांना चारही इसम संगणमत करुन आमचे व गणवेषातील पोलीस संदिप मेहत्रे यांच्या अंगावर येवून असे म्हटले की "तुम्ही आम्हाला पकडणारे कोण, आम्हाला सोडा, नाहीतर आम्ही तुम्हाला पाहून घेवू".

असे त्या चार व्यक्तीनी म्हणून आम्हाला धक्काबुक्की करुन आमच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केला. सदर चारही इसमांना आम्ही सुरक्षीत स्थळी नेवून त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) किशोर इंगळे, २) गजानन पाटील, ३) अशोक पुरी आणि ४) सुरज खोब्रागडे, असे सांगीतले. त्यानंतर त्यांना सुरक्षीत स्थळी स्थानबध्द करण्यात आले. अशाप्रकारे आम्ही आमचे कायदेशिर कर्तव्य पार पाडीत असतांना आम्हाला त्या चार व्यक्तीनी अटकाव करुन, फौजदारीपात्र बलप्रयोग करुन शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आज ते चार व्यक्ती न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे.

**उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. पि. पि. किर्दक यांचे मार्फत सुरु –**

४. संदिप मेहत्रे हे माझे चांगले मित्र नाहीत. मात्र संदिप मेहत्रे हे पोलीस खात्यात असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की संदिप मेहत्रे हा माझा पोलीस सहकारी आहे. संदिप मेहत्रे मी अंदाजे तिन ते चार वर्षापासून ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की ड्युटी व्यतिरिक्त सुध्दा माझी संदिप मेहत्रे सोबत इतर वेळी भेट होते. हे म्हणणे खरे आहे की माझे पोलीस स्टेशन ग्रामीणमध्ये जाणे येणे असते.

५. सभामंडप किती एकराच्या परिसरामध्ये होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या सभामंडपामध्ये गर्दी होती.

**प्रश्न–** सभामंडपामध्ये लाउडस्पीकर मोठया आवाजमध्ये चालू होते ?

**उत्तर–** लाउडस्पीकर चालू होते. मोठया आवाजाबाबत मला सांगता येणार नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की सभा मंडपामध्ये जनतेचा आवाज मोठया प्रमाणात होता. हे मला माहिती नाही की घटनास्थळावर सि.सि.टि.व्ही. लावले होते. मला सांगता येणार नाही की सभामंडपामध्ये दोनशे ते तिनशे शसस्त्र पोलीस कर्मचारी हजर होते. किती कर्मचारी हजर होते हे सुध्दा मला सांगता येणार नाही. माझे शिक्षण झालेले असून मला २०० ते ३०० चा आकडा समजतो.

७. मला माहिती नाही की मुख्यमंत्री येणार असल्यामुळे घटनास्थळावर इतर खात्याचे कर्मचारी व अधिकारी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की मुख्यमंत्र्यांच्या विरोधी पक्षामध्ये असलेल्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना आम्ही सकाळीच स्थानबध्द करतो व विरोधी पक्षाच्या नेत्यांना आम्ही कार्यक्रम स्थळी जाण्यापासून रोखतो.

८. हे म्हणणे खरे आहे की आमची जेथे ड्युटी लागते त्याबाबतची ड्युटी पास तयार करण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की जेथे आमची कर्तव्यस्थळी नियुक्ती होते, त्याची नोंद आमच्या कार्यालयाच्या रजिष्टरमध्ये घेतली जाते व ड्युटी पूर्ण झाल्यावर त्याची नोंद सुध्दा रजिष्टरमध्ये घेतली जाते. ज्या व्यक्तीना स्थानबध्द केले जाते त्याची नोंद आमच्या कार्यालयाच्या रजिष्टरला घेतल्या जाते किंवा नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की मला याबाबत माहिती नाही. हे मला सांगता येणार नाही की घडलेल्या घटनेची नोंद आम्हाला आमच्या रजिष्टरला घ्यावी लागते. घटनास्थळावर अनुचित प्रकार घडला तर त्याची माहिती नियंत्रण कक्षाला किंवा वरिष्ठांना द्यावी लागते. या प्रकरणामधील कथित अनुचित प्रकाराबाबत मी नियंत्रण कक्षाला माहिती दिली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की सोबत वरिष्ठ अधिकारी असल्याने मी तशी माहिती दिली नाही.

९. मला सांगता येणार नाही की प्रकाश तुनकलवार व संदिप मेहत्रे हे कथित घटनास्थळावर अति महत्वाच्या व्यक्तींच्या बंदोबस्तासाठी नेमलेले होते. मला माहित नाही की सभा मंडपासमोरच अति महत्वाच्या व्यक्तींच्या बसण्याची व्यवस्था होती. मला सांगता येणार नाही की सभा मंडपापासून पुढे ५०० ते ६०० मिटर पर्यंत मंडप होता व तो संपूर्ण मंडप गर्दीने भरलेला होता. हे म्हणणे खरे आहे की सभा मंडपामध्ये कोण–कोण, कुठे–कुठे बसलेले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सभा मंडपातील सर्व व्यक्तीना तुम्हाला ओळखता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मी घटनास्थळावर कर्तव्यावर हजर नव्हतो.

१०. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *"सभा सुरु असतांना १६.१५ वाजताच्या सुमारास स्टेज समोरील सभा मंडपाच्या मागील बाजूस चार इसम हे उभे राहून नारेबाजी करुन गोंधळ घालत होते, आम्ही साध्या गणवेषातील पोलीस तसेच गणवेषातील पोलीस हवालदार संदिप मेहत्रे यांनी त्या चारही इसमांना ताब्यात घेवून त्यांना सभा मंडपाच्या बाहेर काढीत असतांना चारही इसम संगणमत करुन आमचे व गणवेषातील पोलीस संदिप मेहत्रे यांच्या अंगावर येवून असे म्हटले की "तुम्ही आम्हाला पकडणारे कोण, आम्हाला सोडा, नाहीतर आम्ही तुम्हाला पाहून घेवू" , असे त्या चार व्यक्तीनी म्हणून आम्हाला धक्काबुक्की करुन आमच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केला, सदर चारही इसमांना आम्ही सुरक्षीत स्थळी नेवून त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) किशोर इंगळे, २) गजानन पाटील, ३) अशोक पुरी आणि ४) सुरज खोब्रागडे, असे सांगीतले, त्यानंतर त्यांना सुरक्षीत स्थळी स्थानबध्द करण्यात आले, अशाप्रकारे आम्ही आमचे कायदेशिर कर्तव्य पार पाडीत असतांना आम्हाला त्या चार व्यक्तीनी अटकाव करुन, फौजदारीपात्र बलप्रयोग करुन शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला, पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते, आज ते चार व्यक्ती न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे".*

११. माझी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची ड्युटी पास या प्रकरणाच्या तपासादरम्यान मी तपास अधिका-यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर नसल्यामुळे मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची ड्युटी पास या प्रकरणाच्या तपासादरम्यान मी तपास अधिका-यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर नसल्यामुळे मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची कथित घटना नियंत्रण कक्षाला सांगीतली नाही".

१२. मला तपास अधिका-यांनी ओळख परेड करीता बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की प्रकाश तुनकलवार व संदिप मेहत्रेच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज पहिल्यावेळेस आरोपींना न्यायालयात पाहत आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की मला माझ्या वरिष्ठांचा कोणताही आदेश नव्हता. हे म्हणणे खरे नाही की आरोपींची नावे मला संदिप मेहत्रे कार्यरत असलेल्या यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशनमधून माहिती पडली. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी – काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक – ०३/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.